## कुलगुरू तथा निवडणुक अपीलीय अधिकारी
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
### (महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींन्वये विविध प्राधिकरणांच्या निवडणुका-२०२२)

महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींन्वये विविध प्राधिकरणांच्या निवडणुकांकरीता एकरुप परिनियम क्र.१/२०१७ मधील तरतुद क्रं.८ (४) प्रमाणे अंतीम मतदार याद्या प्रसिद्ध करण्याकरीताची प्रक्रीया अंतीम टप्यात असुन निवडणुक निर्णय अधिकारी यांनी जवाहर एज्युकेशन सोसायटी, परळी वैजिनाथ या संस्थेच्यावतीने "संस्थाचालक प्रतिनिधी गण" अंतर्गत एका प्रतिनिधीचा नोंदणी अर्ज अपेक्षीत असतांना दोन नोंदणी अर्ज प्राप्त झाले असल्याचे दिनांक ०८.११.२०२२ रोजी कार्यालयीन टिपणीद्वारे सादर केले आहे. विद्यापीठ अधिनियमातील तरतुदी लक्षात घेता संलग्नित महाविद्यालयाच्या संस्थेच्यावतीने संस्थाचालक प्रतिनिधी गणात केवळ एका प्रतिनिधीचे नाव नोंदणी करीता प्रस्तावित करणे अपेक्षीत आहे. परंतु असे असतांनाही सदर संस्थेच्यावतीने प्राप्त झालेल्या दोन वेगवेगळया अर्जांमुळे विशेष परिस्थिती निर्माण झाली आहे. या दोघांपैकी नेमका कोणता नोंदणी अर्ज हा संस्थेच्यावतीने अधिकृतरित्या प्रस्तावित करण्यात आला आहे याबाबत संभ्रम निर्माण झाल्याने दोन्हीही अर्जदारांना तात्काळ नोटिस पाठवुन दिनांक ०९.११.२०२२ रोजी दुपारी ०१:०० वाजता सुनावणीकामी उपस्थित राहण्याकरीता सुचीत केले होते. त्याप्रमाणे श्री. इटके दत्तात्रय गणपतप्पा (डी-२८१) यांच्यावतीने त्यांचे प्रतिनिधी म्हणुन श्री. रमाकांत फड सुनावणीकामी हजर आहे मात्र श्री. मुंढे सदाशिव सिताराम (डी.१९३) हे सुनावणीकामी अनुपस्थित असुन त्यांच्यावतीने त्यांनी प्रतिनिधी देखील पाठवलेला नाही.

याबाबत श्री. इटके यांचे प्रतिनिधी श्री. रमाकांत फड यांनी अभिलेखावर चौकशी अर्ज क्रं.५९/२०१७ मधील निशाणी क्रं.३ वरील आदेश, चौकशी अर्ज क्रं.४८/२०१७ मधील निशाणी क्रं.३ वरील आदेश व संस्थेच्या परिशिष्ठ-१ ची नक्कल दाखल केली व श्री. इटके हेच जवाहर एज्युकेशन सोसायटीचे अधिकृत सभासद असुन त्यांच्या मतदार नोंदणीचा अर्ज ग्राह्य धरण्यात यावा अशी विनंती केली.

याबाबत मी श्री. इटके व श्री. मुंढे या दोघांच्याही मतदार नोंदणीचे अर्ज व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. याशिवाय श्री. इटके यांचे प्रतिनिधी श्री. फड यांनी दाखल केलेली कागदपत्रेही पाहिली. निवडणुक एकरुप परिनियम क्रं.१/१७ मधील तरतुदींचे वाचन केले असता संस्थाचालक प्रतिनिधी गणामधुन मतदार म्हणुन नोंदणी करावयाची असल्यास प्रत्येक मतदारास नोंदणीच्या अर्जासोबत तो सदर संस्थेच्या सभासदांपैकी एक आहे हे दर्शविण्यासाठी धर्मादाय आयुक्त कार्यालयाने जारी केलेली संस्थेची परिशिष्ठ-१ ची नक्कल दाखल करणे आवश्यक आहे किंवा त्याअर्थी धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल केलेल्या बदल अर्जाची नक्कल दाखल करणे आवश्यक आहे. श्री. इटके व श्री. मुंढे या दोघांच्याही संदर्भाने संस्थेचे अभिलेख पाहिले असता सदर संस्थेच्या सभासदांमध्ये अंतर्गत गट-तट व विवाद असल्याचे दिसुन येते. शिवाय संस्थेच्या सभासदांमध्ये धर्मादाय आयुक्त व विविध न्यायालयांमध्ये अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचेही दिसुन येते. त्याअर्थी जवाहर एज्युकेशन सोसायटीच्यावतीने अधिकृत रित्या त्यांचा प्रतिनिधी नेमका कोण आहे हे ठरविणे या कार्यालयास शक्य नाही. करीता संस्थाचालक प्रतिनिधी गणामध्ये वरील नमुद संस्थेच्यावतीने मतदार नोंदणीकरीता प्राप्त झालेली दोन्ही अर्ज स्वीकारता येणार नाही अशी माझी धारणा झाली आहे. करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद दोन्ही अर्ज नाकारीत असुन त्यानुषंगाने निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी दोन्हीही नावे संस्थाचालक गणातुन वगळावीत.

दिनांक : ०९.११.२०२२
विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**कुलगुरू तथा**
**निवडणुक अपीलीय अधिकारी**